# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 23/02/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

### जनावरांची निर्दयतेने वागणुक करणाऱ्यांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर चौधरी ढाबा वडोदा शिवार येथे दिनांक 21/02/2021 चे 22.00 वा. ते दिनांक 22/02/2021 चे 10.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– आशा महेंद्र दवे, वय 34 वर्ष, रा. बरकिन्ही ता साकोली जि भंडारा या दि. 21/02/2020 रोजी सायकांळी 05.30 वा. दरम्यान सोबत ड्रायव्हर सतीश खरपूरे, सौ. महेक जनई असे मिळून ध्यान फाउंडेशन गौशाला संस्थेची वेगनार फोरव्हीलर गाडी क्र एमएच–34/के–8918 ने नागपूरकडे जात होते. त्यादरम्यान मौजा वडोदा शिवारात चौधरी ढाब्याच्या बाजूला काही अंतरावर खाली जागेत अज्ञात आरोपीने जनावरांना जमा करुन एकाच दावनिला बांधून ठेवलेले दिसले. त्यावरून फिर्यादी यांनी पो. स्टे. मौदा येथे जावुन सदर माहिती दिली. यानंतर पो. स्टे. मौदा येथील पोलिस स्टाफ यांनी दि 21/02/2021 चे 21.22 वा. रवाना होवून घटनास्थळी जावून पाहीले असता मोठे गौवंश जातीचे जनावरे हे दावनीला बांधून चारापाण्याची व्यवथा न करता उपासमारीने व्याकूळ होतील अशा स्थितीत होते. त्या ठिकाणी एक व्यक्ती काही महिला हया उभ्या होत्या पोलीसांना पाहून ते निघून गेले. त्या ठिकणी जनावरे 109 प्रत्येकी किं. 10,000/– रु प्रमाने असे एकुण कि 10,90,000/– रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1),11(1)(एफ),11 (1)(आय) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आगासे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर